RNI No. MAHBIL/2009/36619

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण भाग एक–कोकण विभागीय पुरवणी

वर्ष १२, अंक ३५(२)] गुरुवार, मे १४, २०२६/वैशाख २४, शके १९४८ [पृष्ठे ४, किंमत : रुपये ११.००

असाधारण क्रमांक ५३

प्राधिकृत प्रकाशन

नगरविकास विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १२ मे, २०२६.

अधिसूचना

महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम,१९६६.

क्रमांक टिपीबी-४३२६/१२२/प्र.क्र.६४/२०२६/नवि-११.—ज्याअर्थी, महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ (यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त अधिनियम" असा करणेत आलेला आहे.) च्या तरतुदींनुसार बृहन्मुंबई महानगरपालिका त्यांचे अधिकार क्षेत्राकरीता (यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त महानगरपालिका" असा करणेत आलेला आहे.) नियोजन प्राधिकरण आहे;

ज्याअर्थी, उक्त अधिनियमाचे कलम ३१ पोट-कलम (१) अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करून राज्य शासनाने अधिसूचना क्र. टिपीबी-४३१७/६२९/प्र.क्र.१९८/२०१७/वियो/नवि-११, दि. ८/०५/२०१८ (यापुढे याचा उल्लेख "उक्त अधिसूचना" असा करणेत आलेला आहे) द्वारे बृहन्मुंबई प्रारूप विकास योजना २०३४ (यापुढे याचा उल्लेख "उक्त विकास योजना" असा करणेत आलेला आहे) सह विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली २०३४ ला (यापुढे याचा उल्लेख "उक्त नियमावली" असा करणेत आलेला आहे) उक्त अधिसूचनसोबतचे परिशिष्ट-ब मध्ये दर्शविलेले सारभूत स्वरुपाचे फेरबदल (ई.पी.) वगळून उक्त अधिसूचनेत परिशिष्ट-अ मध्ये दर्शविलेल्या सुधारणेसह मंजुरी दिली आहे. आणि ज्याअर्थी शासनाने उक्त अधिसूचनेस सम क्रमांकाचे शुद्धीपत्रक दि. २२ जून २०१८ रोजी निर्गमित केले आहे आणि ज्याअर्थी, त्यानंतर उक्त अधिसूचनेस शासनाने समक्रमांकाचे शुद्धीपत्रक व पुरकपत्र दि. २९ जून, २०१८ रोजी पारित केले असून सदर शुद्धीपत्रक व पुरकपत्र **महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात** दि. ३० जून, २०१८ रोजी प्रसिद्ध करण्यात आले आहे; आणि ज्याअर्थी, उक्त नियमावली दि. १/०९/२०१८ पासून अंमलात आली आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त विकास योजनेनुसार, न.भू.क्र. ११०३अ (भाग), मौजे- वर्सोवा, मुंबई ही जमिन (यापुढे याचा उल्लेख "उक्त जमिन" असा करणेत आलेला आहे.) विविध आरक्षणे/नामनिर्देशने व ९.१५ मी. रूंद विकास योजना रस्त्याने (यापुढे याचा उल्लेख "उक्त विकास योजना रस्ता" असा करणेत आलेला आहे.) बाधित होत असून रहिवास विभागात समाविष्ट आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त महानगरपालिकेकडील दि. ०२/०२/२०२६ रोजीचे पत्रान्वये फेरबदल प्रस्ताव शासन नगरविकास विभागास प्राप्त झाला असून, सदर पत्रात असे नमूद आहे की, मुख्य अधिकारी, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळ (यापुढे याचा उल्लेख "म्हाडा" असा करणेत आलेला आहे.) यांनी दि. १६/०७/२०२५ रोजीच्या पत्राद्वारे उक्त जमिनीवरील खेळाच्या मैदानाचे आरक्षणाकडे (ROS१.४)

जाणारा उक्त ९.१५ मी. विकास योजना रस्ता वगळण्याबाबत उक्त महानगरपालिकेस विनंती केली आहे. उक्त ९.१५ मी. रुंद विकास योजना रस्ता हा खेळाच्या मैदानाच्या आरक्षणाकरिता पोहोच मार्ग म्हणून प्रस्तावित होता. तथापि, आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांचे एम.सी.पी/५७९२ दि. २२/०७/२०२५ अन्वयेचे मंजुरीनुसार अस्तित्वातील खेळाचे मैदान (EOS१.४) + खेळाचे मैदानाचे आरक्षण (ROS१.४) + बगीचा/ उद्यान (ROS१.५) चे आरक्षण पुनर्स्थापित करण्यात आले असून, सदर पुनर्स्थापित आरक्षणे/नामनिर्देशने यांना १८.३० मी. च्या रस्ता रुंदीकरणाने बाधित अस्तित्वातील रस्त्यावरून थेट पोहचमार्ग उपलब्ध आहे. यास्तव, उक्त जमिनीवर दर्शविण्यात आलेल्या उक्त ९.१५ मी. रूंद विकास योजना रस्त्याची आता आवश्यकता नाही. त्यामुळे, म्हाडाने केलेल्या विनंतीनुसार, उक्त ९.१५ मी. रूंद विकास योजना रस्ता वगळण्यास हरकत नाही, असे उक्त महानगरपालिकेची धारणा आहे, असे नमूद केले आहे;

आणि ज्याअर्थी, वरील वस्तुस्थिती विचारात घेऊन उक्त महानगरपालिकेने उक्त अधिनियमाचे कलम ३७ चे पोट कलम (१) नुसार प्राप्त अधिकारांतर्गत उक्त जमिनीवर दर्शविण्यात आलेला साधारणतः ४९४.८६ चौ.मी. क्षेत्रावरील उक्त ९.१५ रुंद विकास योजना रस्ता रद्द करणेबाबत फेरबदल प्रस्ताव कार्यान्वित केला आहे (यापुढे याचा उल्लेख "प्रस्तावित फेरबदल" असा करणेत आलेला आहे.); आणि ज्याअर्थी, उक्त महानगरपालिकेने सदर प्रस्तावित फेरबदलाची सूचना सामान्य जनतेच्या सूचना/हरकतीकरिता **महाराष्ट्र शासन राजपत्रात** दि.२३-२९ ऑक्टोबर, २०२५ रोजी प्रसिद्ध केली आहे; आणि ज्याअर्थी, उक्त महानगरपालिकेने उक्त अधिनियमाचे कलम ३७(१) अन्वये प्रस्तावित फेरबदलाची वैधानिक कार्यवाही पूर्ण करून दि. ०२/०२/२०२६ पत्रान्वये फेरबदल प्रस्ताव शासनाचे मान्यतेसाठी सादर केला आहे;

आणि ज्याअर्थी संचालक, नगररचना, महाराष्ट्र राज्य, पूणे यांनी त्यांचेकडील दि. ०९/०४/२०२६ रोजीचे पत्राद्वारे सदर प्रस्तावित फेरबदलावर अहवाल सादर केला आहे;

आणि ज्याअर्थी उक्त महानगरपालिकेची विनंती विचारात घेऊन व संचालक, नगररचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेशी सल्लामसलत केल्यानंतर प्रस्तावित फेरबदल मंजूर करणे आवश्यक असल्याचे शासनाचे मत झालेले आहे;

आता त्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३७(२) अन्वये प्राप्त अधिकारात आणि त्या संदर्भातील सर्व शक्तींचा वापर करून शासन याद्वारे :-

(अ) उक्त प्रस्तावित फेरबदलाचे प्रस्तावास खालील परिशिष्टामध्ये नमूद केलेप्रमाणे मंजूरी देत आहे.

(ब) सदरची अधिसूचना **शासकीय राजपत्रामध्ये** प्रसिद्ध झाल्याचा दिनांक हा उक्त फेरबदल अंमलात आलेचा दिनांक असेल.

(क) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या उक्त विकास योजनेच्या मंजूरी सोबतच्या फेरबदलाचे परिशिष्टामध्ये शेवटच्या नोंदीनंतर खालील परिशिष्ट समाविष्ट करणेचे निर्देश देत आहे.

परिशिष्ट

"The 9.15m wide Development Plan Road admeasuring approx. 494.86 sq.m. shown on the land bearing C.T.S. No.1103A(part) of village-Versova, Mumbai is deleted as shown on plan."

सदर अधिसूचना महाराष्ट्र शासनाच्या *www.maharashtra.gov.in* (कायदे /नियम) या वेबसाईटवर देखील उपलब्ध करण्यात आली आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

अमर पाटील,
शासनाचे अवर सचिव.

URBAN DEVELOPMENT DEPARTMENT

Mantralaya, Mumbai 400 032, dated 12th May, 2026

NOTIFICATION

MAHARASHTRA REGIONAL AND TOWN PLANNING ACT, 1966.

No. TPB-4326/122/C.R.64/2026/UD-11.—Whereas, the Municipal Corporation of Greater Mumbai is the Planning Authority for the area within its jurisdiction (hereinafter referred to as "the said Corporation") as per the provision of Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (hereinafter referred to as "the said Act").

Whereas, in exercise of the powers conferred by sub Section (*1*) of Section 31 of the said Act, the State Government *vide* Notification No. TPB-4317/629/CR-118/2017/DP/UD-11, Dt. 08/05/2018 (hereinafter referred to as "the said Notification") has accorded sanction to the Draft Development Plan-2034 of Greater Mumbai (hereinafter referred to as "the said Development Plan") along with the Development Control and Promotion Regulations-2034 (hereinafter referred to as "the said Regulations") for Greater Mumbai with modifications shown in SCHEDULE-A appended to the said Notification excluding the substantial modifications as shown in SCHEDULE-B appended to the said Notification. And whereas, Government has issued corrigendum of even number dt. 22nd June, 2018; And whereas, thereafter Government has issued a Corrigendum and Addendum of even number dt. 29th June, 2018 to the said Notification, which is published in *Government Gazett*e dt. 30th June, 2018; And whereas, the said Regulations have come into force from 1/09/2018;

And whereas, as per the said Development Plan, CTS No.1103A (part) of Village-Versova, Mumbai is affected by various reservations/designations and 9.15m wide Development Plan road (hereinafter referred to as "the said DP road") and is situated in Residential Zone (hereinafter referred to as "the said Land");

And whereas, Government in Urban Development Department has received a modification proposal *vide* a letter dated 02/02/2026 from the said Corporation wherein it is stated that, Chief Officer, Mumbai Housing and Area Development Board (hereinafter referred to as "MHADA") *vide* letter dated 16/07/2025 has requested the said Corporation to delete the said 9.15 m wide DP road leading towards reservation of Playground (ROS1.4) shown on the said Land. The said DP Road was proposed for an access to Play Ground (ROS1.4). However, as per approval of Municipal Commissioner, Brihanmumbai Mahanagarpalika u/no. MCP/5792, dated 22/07/2025, the existing amenity of Play Ground (EOS1.4) + reservation of Play Ground (ROS1.4) + Garden/Park (ROS1.5) are relocated within the layout and now the reservations/ existing amenities are accessible directly from the existing road proposed to be widened to 18.30 m and hence the said 9.15 wide DP Road shown on said Land is not required and the said Corporation is of the opinion that the said 9.15 m DP road can be deleted as requested by MHADA;

And whereas, considering the abovesaid facts, in exercise of the powers conferred under sub-section (*1*) of Section 37 of the said Act, the said Corporation has initiated modification proposal to delete the said 9.15 m wide DP Road admeasuring approx.494.86 sq.m. shown on the said Land (hereinafter referred to as 'the proposed modification'); And whereas accordingly, the said Corporation had issued Notice for inviting suggestions/objections from the general public with regard to the proposed modification which is published in *Maharashtra Government Gazette* on 23-29th October, 2025; And whereas, the said Corporation after completing all the legal procedure regarding the proposed modification as stipulated under Section 37(*1*) of the said Act, has submitted the modification proposal *vide* letter dated 02/02/2026 to the Government for sanction;

And whereas, Director of Town Planning, Maharashtra State, Pune *vide* his letter dated 09/04/2026 has submitted his report to the Government on the proposed modification;

And whereas, after considering the request of the said Corporation and after consulting the Director of Town Planning, Maharashtra State, the Government is of the opinion that the proposed modification is required to be sanctioned;

Now, therefore, in exercise of the powers conferred upon it under Section 37(*2*) of the said Act, the Government hereby :—

(A) Sanctions the proposed modification as described more specifically in the *Schedule* hereinunder.

(B) Fixes the date of publication of this Notification in the *Official Gazette* as the date of coming into force of this modification.

(C) Directs the said Corporation that in the Schedule of Modifications sanctioning the said Development Plan, after the last entry, the Schedule referred to at (A) above shall be added.

Schedule

"The 9.15 m wide Development Plan Road admeasuring approx.494.86 sq.m. shown on the land bearing C.T.S. No.1103A(part) of village-Versova, Mumbai is deleted as shown on plan."

This Notification shall also be published on the Maharashtra Government website—*www.maharashtra.gov.in* (Acts/ Rules).

By order and in the name of the Governor of Maharashtra,

AMAR PATIL,
Under Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.